



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आमदार महेश बालदी, आमदार महेंद्र थोरवे आदी मान्यवर उपस्थित होते.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ६२
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, १८ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


# रायगडात भेसळखोरांना एफडीएचा दणका

## ८७ लाखांचे प्रतिबंधात्मक पदार्थ जप्त; १९ जणांवर गुन्हे दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अन्न व औषध विभागाने (एफडीए) रायगड जिल्ह्यातील भेसळखोर आणि प्रतिबंधित वस्तूंची विक्री करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली एफडीएने ८७ लाख ५८ हजार रुपयांचा प्रतिबंधात्मक अन्न पदार्थ जप्त केले असून १९ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सण-उत्सवांच्या काळात भेसळयुक्त खाद्यपदार्थांची विक्री वाढते. दुध, दुग्धजन्य पदार्थ, खवा, पनीर यांची मोठ्या प्रमाणात भेसळ होत असते. ही बाब लक्षात घेऊन अन्न व औषध प्रशासन विभागाने भेसळखोरांविरोधात व्यापक कारवाईला सुरुवात केली आहे. त्यामुळे भेसळखोरांचे धाबे दणाणले आहेत.

रायगडात एफडीएने ३१० अन्न नमुन्यांची तपासणी केली होती. यातील १०७ नमुने प्रमाणित करण्यात आले असून अप्रमाणित चार आणि असुरक्षित चार असे आठ नमुने आढळले. त्यांच्यावर कारवाई सुरू आहे. अन्न पदार्थांबाबत ६१८ ठिकाणी तपासणी करून १२९ जणांना सुधारणा नोटीस देण्यात आलेली आहे. आठ जणांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. प्रतिबंधित गुटखा, पान मसालाप्रकरणी ३९ कारवाया केल्या असून ८९ लाख ५८ हजार १४५ रुपयांचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

दूध व दुग्धजन्य पदार्थप्रकरणी एफडीएने दोन कारवाया केल्या आहेत. त्यात १६९६ लिटर दूध व दुग्धजन्य पदार्थ भेसळयुक्त असल्याच्या संशयावरून तसेच विनापरवाना विक्री करीत असल्याने ८४ हजार रुपयांचा माल जप्त करून नष्ट केला आहे. ११३ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करून नऊ लाख ४७ हजारांचा दंड शासनजमा करण्यात आला.

प्रतिबंधित अन्नपदार्थ कारवाईत ८७ लाख ५८ हजार १४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून १९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. सणासुदीच्या दिवसांत भेसळ करणाऱ्यावर कडक कारवाई केली जाणार आहे, असा इशाराही एफडीएने दिला आहे.

अन्न भेसळ करणारे, प्रतिबंधित अन्नपदार्थ बाळगणारे यांची तपासणी मोहीम अन्न व औषध विभागाने सुरू केली आहे. अन्नात भेसळ करून ग्राहकांना विक्री करणे कायद्याने गुन्हा आहे. असे असतानाही काही जण भेसळयुक्त पदार्थ विक्री करीत आहेत. सण-उत्सव काळात हे प्रकार अधिक वाढत असतात. भेसळयुक्त अन्नपदार्थ खाल्ल्याने विषबाधा होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे अन्न व औषध विभागाकडून तपासणी मोहीम सुरू आहे.

### मिठाई विक्रेत्यांवर करडी नजर

सध्या गणेशोत्सव सुरू आहे. या काळात भाविक मिठाई मोठ्या प्रमाणात खरेदी करीत असतात. अशावेळी भेसळयुक्त मिठाई विक्रीस ठेवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गणेशोत्सव काळात भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मोहीम तीव्र करण्यात आली आहे. विशेषत: मिठाई विक्रेत्यांवर करणाऱ्यांवर एफडीएची करडी नजर आहे.

*सणासुदीच्या दिवसांत मिठाई, मावा उत्पादन करणाऱ्या आस्थापनांची तपासणी करण्यात येत आहे. त्याचबरोबर हॉटेल, रेस्टॉरंटबाबत तपासणी मोहीम राबविली जात आहे. भेसळ करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई सुरू आहे. जनतेनेही भेसळ होत असेल, तर आमच्या कार्यालयाशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी.*
*-मिलिंद महांगडे,*
*सहाय्यक आयुक्त,*
*अन्न व औषध प्रशासन, रायगड*

# वायू-जलप्रदूषण रोखण्यासाठी राज्यस्तरीय समिती गठित

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा समावेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



राज्यातील वायू व जलप्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांकडून घेतली जाणारी बँक हमी (डिपॉझिट रक्कम) वाढविण्याबाबत अभ्यास करून ठोस उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य शासनाने राज्यस्तरीय समिती गठित केली आहे. पर्यावरण व वातावरणीय बदलमंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती काम करणार असून पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांचा या समितीत समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील औद्योगिक विकासासोबतच पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने ही समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांकडून प्रदूषण नियंत्रणासाठी घेण्यात येणाऱ्या बँक हमीच्या रकमेत वाढ करण्याची आवश्यकता आहे का याचा तज्ज्ञांच्या माध्यमातून अभ्यास समिती करणार आहे तसेच वायू व जलप्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक तांत्रिक उपाययोजना, धोरणात्मक निर्णय आणि प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने समिती शासनाला शिफारशी करणार आहे.

या समितीत आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार प्रशांत ठाकूर, अमल महाडिक तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी, तज्ज्ञांचा समावेश आहे. पश्चिम कोलफिल्ड्स लि., महावीज निर्मिती केंद्र तसेच स्टील उद्योगांच्या प्रतिनिधींनाही समितीमध्ये स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रातील प्रत्यक्ष अडचणी, प्रदूषण नियंत्रणाच्या विद्यमान उपाययोजना आणि त्यातील त्रुटी यांचा सर्वंकष आढावा घेणे शक्य होणार आहे.

दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनी यापूर्वीही वायू प्रदूषणाच्या प्रश्नासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यामुळे राज्यस्तरीय समितीवर त्यांचा समावेश झाल्याने औद्योगिक क्षेत्राशी संबंधित पर्यावरणीय प्रश्नांना समितीसमोर प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळणार आहे. प्रदूषण नियंत्रण आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्यासाठी समितीच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण अभ्यास होणार आहे.

### आढावा घेऊन सुचवणार उपाय

राज्यातील विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये प्रदूषणाची समस्या असलेल्या ठिकाणांचा आढावा घेऊन समिती आवश्यक उपाययोजना सुचविणार आहे. प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बदलांपासून ते धोरणात्मक निर्णयांपर्यंत विविध बाबींचा विचार समितीच्या माध्यमातून केला जाणार आहे. उद्योगांकडून पर्यावरणीय नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे व्हावे आणि प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सक्षम व्हावी यासाठी व्यवहार्य उपाययोजनांवर समिती भर देणार आहे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये वीज पडून पाच जणांचा मृत्यू

**सिल्लोड, कन्नड : प्रतिनिधी**

मराठवाड्यात एकीकडे दुष्काळसदृश्य परिस्थिती असताना दुसरीकडे गुरुवारी (दि.१७) दुपारी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वादळी पावसात वीज पडून घडलेल्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांचा मृत्यू झाला आहे, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत.

सिल्लोड तालुक्यातील दहिगाव येथे वादळी पावसादरम्यान झोपडीवर वीज कोसळल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला आहे.

कन्नड तालुक्यातील पिशोर येथेही वीज पडण्याची दुर्घटना घडली. यात तीन महिलांचा मृत्यू झाला असून दोन महिला आणि एक पुरुष गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

# मराठवाडा दुष्काळमुक्त करणार -मुख्यमंत्री

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**



मराठवाड्याचा आधी स्वातंत्र्यासाठी संघर्ष झाला, आता दुष्काळाशी संघर्ष सुरू आहे. यंदाही पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत आहे. या परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. ही परिस्थिती बदलवण्यासाठी कोकणातील आणि कृष्णाखोऱ्यातील वाहून जाणारे पाणी आपण मराठवाड्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करू, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१७) येथे दिला.

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण, मानवंदना, शहीद स्मारकास अभिवादन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

सिद्धार्थ उद्यान येथे झालेल्या या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, महापौर समीर राजूरकर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे, खासदार संदिपान भुमरे, डॉ. कल्याण काळे, आमदार रमेश बोरनारे, प्रदीप जयस्वाल, प्रशांत बंब, विलास भुमरे, अनुराधा चव्हाण, नारायण कुचे, सतिष चव्हाण, अंबादास दानवे, सुहास शिरसाट, माजी खासदार चंद्रकांत खैरे, इम्तियाज जलील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, मुक्तिसंग्राम सैनिक, त्यांचे कुटूंबिय, अधिकारी-कर्मचारी, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाकरिता जेवढे निर्णय आम्ही घेतले, तेवढे कोणी घेतले नाहीत, असे सांगितले.

## निवडक

### गणेश विसर्जनावेळी तलावात बुडून सहा मुलांचा मृत्यू

**हैदराबाद** : तेलंगणाच्या संगारेड्डी जिल्ह्यातील पेड्डाकंजेर्ला गावात गणपती विसर्जन करताना सहा मुलांचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मृत्यू पावलेली सर्व मुले ही शिरीषा चॅरिटेबल ट्रस्टद्वारे चालवल्या जाणाऱ्या एका शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थी होते. उपस्थित असलेल्या लोकांनी मुलांना वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. या दुर्घटनेमुळे हळहळ व्यक्त होत आहे.

### अभिषेक शर्माने ३० चेंडूत शतक ठोकत रचला इतिहास

**नवी दिल्ली** : अफगाणिस्तानविरुद्धच्या तिसऱ्या आणि अखेरच्या टी-२० सामन्यात अभिषेक शर्माने नऊ चौकार आणि ११ षटकारांची आतषबाजी करत विक्रमी शतक झळकावले. अवघ्या ३० चेंडूत शतक पूर्ण करताना त्याने एका डावात अनेक दिग्गजांना मागे टाकले. भारताकडून आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान शतक झळकावण्याचा विक्रमही आता त्याच्या नावावर झाला आहे. अभिषेकने ३४ चेंडूत १०८ धावांची खेळी केली.

# पनवेल मनपातर्फे सेवा संकल्प अभियान

## विविध सामाजिक उपक्रम राबविणार -महापौर नितीन पाटील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सगळे जीवन देशाप्रती समर्पित केले आहे. त्यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या एक महिन्याच्या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन महापौर नितीन पाटील यांनी सांगितले.

या अभियानाचा शुभारंभ गुरुवारी (दि.१७) छत्रपती संभाजी मैदानावर महापौर पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

उद्घाटन समारंभास उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक सर्वश्री गणेश कडू, सुमित झुंजारराव, कुसुम म्हात्रे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य लेखा वित्तधिकारी पूनम पाटील, लेखाधिकारी संग्राम व्होरकटे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, भांडार विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय प्रतीकांची मानवी रांगोळी साकारण्यात आली तसेच अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देणाऱ्या फलकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. महापौर नितीन पाटील यांनी शालेय विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले, तर शालेय विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत शुभेच्छा पोहचविण्याच्या उद्देशाने महापौरांना पुष्पगुच्छ प्रदान केला.

या अभियानात स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, स्वच्छता लक्षित युनिट परिवर्तन, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाईमित्र सन्मान, युवक व विद्यार्थी सहभाग आणि कचऱ्यापासून संपत्ती निर्मिती यांसारखे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. **(अधिक वृत्त पान ५ वर..)**

# माथेरानचा शारलोट तलाव पुन्हा वाहू लागला!



**माथेरान** : येथील जलसाठ्याचा मुख्य आधार असलेला ब्रिटिशकालीन शारलोट तलाव पूर्ण क्षमतेने भरून वाहू लागला आहे. गणेशोत्सवात तलाव तुडुंब भरल्याने स्थानिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी तलावातील गाळ काढण्याच्या उद्देशाने नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी नागरिकांच्या आग्रहाखातर पाणी सोडण्याचा निर्णय घेतला होता. याद्वारे तलाव काही प्रमाणात स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर सुमारे पंधरा दिवसांनी तलावाचे पाणी रोखण्यात आले. त्याच काळात पावसाने उघडीप दिल्याने तलाव पुन्हा भरेल का याबाबत संदिग्धता होती, परंतु भोवताली असलेल्या नैसर्गिक जलस्रोतांमुळे शारलोट तलाव महिनाभरात पुन्हा भरला आहे. त्यामुळे आगामी काळात पर्यटकांना येथील नयनरम्य धबधबा आणि सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या 'रिव्हर्स वॉटरफॉल'चा आनंद घेता येणार आहे.


॥ श्री गणेशाय नमः ॥

राम प्रहर




तुमचा लाडका बाप्पा झळकणार 'दै. रामप्रहर'मध्ये!

**गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!**
**आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहूद्या...**
**२४ सप्टेंबरपर्यंत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो 'रामप्रहर'मध्ये विनामूल्य प्रसिद्ध केले जाणार आहेत.**

**बाप्पाचा फोटो इथे पाठवा**
**ई-मेल आयडी : ramprahar@gmail.com**
**व्हॉट्सॲप क्रमांक : ७७३८१०६००९**

**फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा**
- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...

**दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!**


# सोनपावलांनी गौराईचे आगमन

## आज होणार प्रतिष्ठापना; महिलावर्गात उत्साह

**अलिबाग : प्रतिनिधी**



गणरायाच्या आगमनानंतर गुरुवारी (दि.१७) गौराईचे घरोघरी सोनपावलांनी आगमन झाले आणि अंगणापासून उंबरठ्यापर्यंत उत्साहाचे रंग खुलले. गौराईच्या स्वागतामुळे विशेषतः महिलावर्गात आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

कोकणात गणेशोत्सवाचा उत्साह टिपेला पोहचला आहे. गणरायानंतर कोकणवासीयांना वेध लागले होते ते गौरी आगमनाचे. अखेर गुरुवारी त्यांचेही आगमन झाले. परंपरेनुसार तेरड्याच्या गौराई घरी आणल्या जातात. वाजतगाजत गौराईचे घरोघरी आगमन झाल्यानंतर त्यांना आकर्षक पद्धतीने सजविण्यात येते. विविध वस्त्रालंकारांनी गौराईचा साजशृंगार करण्यात येतो. भेंडीच्या फुलांनी पूजा करून सामूहिक आरती होते.

यावेळी गौराईला आवडणाऱ्या भाजी-भाकरीचा नैवेद्य दाखवण्यात येतो. पूजेनंतर महिलांच्या नाचगाणी, फुगड्या आणि पारंपरिक खेळांनी उत्सवाला आणखी रंगत येते. अनेक ठिकाणी माहेरवाशिणींच्या उपस्थितीने घराघरातील आनंद द्विगुणित होत असतो. अशा या गौराईच्या पूजनाचा सोहळा शुक्रवारी होणार आहे.

दरम्यान, अधूनमधून पावसाच्या सरी बरसत असल्या तरी त्याचा भाविकांच्या उत्साहावर कोणताही परिणाम झालेला नाही. गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या कोकणवासीयांमध्ये उत्साह कायम असून गौराईच्या स्वागतासाठी महिलांची लगबग सुरू आहे. यंदा जिल्ह्यात तब्बल १६ हजार १७५ गौराईंचे आगमन झाले आहे.

गौरी पूजनासाठी सवाष्ण महिला तसेच बालिकांकडून सुपांचा वापर केला जात असल्याने या काळात त्यांची मागणी वाढते. गौरी पूजनाच्या निमित्ताने नववधू माहेरहून सासरी विविध फळांसह करंजी, पुरणपोळी, मिठाई तसेच अन्य पदार्थांनी भरलेले सुप घेऊन येते. सासरच्या आप्तस्वकीयांना भरलेले सुप भेट देण्याची परंपराही अनेक भागात आहे. त्यामुळे गौरी आगमनापूर्वी सुप खरेदीसाठी महिलांची लगबग वाढल्याचे चित्र पहावयास मिळाले.

गौरीला ग्रामीण भागात काही ठिकाणी मांसाहारी, तर काही ठिकाणी शुद्ध शाकाहारी नैवेद्य दाखवला जातो. यावेळी शेजारी, नातेवाईक मंडळी, मित्रमंडळी एकत्रित येऊन सहभोजन करतात. त्यामुळे पुढील दोन दिवस कोकणातील घराघरांत गौराईच्या पूजेचा, भोजनाचा आणि पारंपरिक उत्सवाचा दरवळ अनुभवायला मिळणार आहे. त्यानंतर शनिवारी गौराईंचे गणरायांसोबत विसर्जन केले जाईल.

# सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ

## नवी मुंबई पालिका मुख्यालयासमोर बोधचिन्हाची भव्यतम मानवी रांगोळी

**नवी मुंबई : बातमीदार**

१७ सप्टेंबरपासून महिन्याभराच्या कालावधीत राबविल्या जाणा–या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आज अभियानाच्या प्रारंभदिनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोरील प्रांगणात हिरवळीवर महात्मा गांधीजींचा चष्मा स्वरूपातील स्वच्छ भारत अभियानाचे बोधचिन्ह साकारणारी भव्यतम मानवी रांगोळी साकारण्यात आली होती.




नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छताकर्मींनी सहभागी होत साकारलेल्या मानवी रांगोळी या अभिनव उपक्रमाप्रसंगी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती अशोक पाटील, सभागृहनेते सागर नाईक, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा परीक्षक राजेंद्र गाडेकर तसेच इतर विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून त्यांच्या कार्यकाळातील 'सेवा परमो धर्म' या उक्तीप्रमाणे सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या वाढदिवसापासून दि. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे.

यानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असून त्याची सुरूवात आज घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या पुढाकारातून महात्मा गांधीजींचा चष्मा असलेले स्वच्छ भारत अभियानाचे बोधचिन्ह स्वच्छतामित्रांच्या भव्यतम मानवी रांगोळीच्या माध्यमातून प्रतिकचिन्ह साकारून झाली.

याप्रसंगी महापौर सुजाता पाटील यांनी समस्त नवी मुंबईकर नागरिकांच्या वतीने दूरदृष्टी असणारे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकलपना नजरेसमोर ठेवून कार्यवाटचाल करणा–या पंतप्रधानांमुळे देशाचा नावलौकिक संपूर्ण जगभरात होत असल्याचे सांगितले.

# ओएनजीसीविरोधात न्हावे ग्रामस्थांचे आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओएनजीसी प्रशासनाच्या कथित मनमानी कारभाराविरोधात आणि स्थानिक कामगारांच्या रोजगार कपातीच्या निषेधार्थ न्हावे ग्रामस्थांनी बेमुदत संप पुकारला आहे. ग्रामसुधारक मंडळ न्हावे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनामुळेपरिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलीस प्रशासन घटनास्थळीदाखल झाले आहे.

बुधवार, १६ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून या आंदोलनाला सुरुवातझाली. स्थानिक कामगारांना कामावरून कमी करून बाहेरील कंत्राटदारांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. या निर्णयामुळे स्थानिक तरुणांच्या रोजगारावर परिणाम होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीपसरली आहे.आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीसबंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. घटनास्थळी पोलीस अधिकारी आणिआंदोलकांमध्ये विविध मुद्दर्‍यांवर चर्चा झाली.

यावेळी आंदोलकांनी नियमित कर्मचाऱ्यांना विरोध नसून कंत्राटदारांच्या मनमानी कारभाराला आणि कामगार कपातीला विरोध असल्याचे स्पष्ट केले.ग्रामसुधारक मंडळ आणि महिला मंडळाच्यावतीने सर्व ग्रामस्थ व कामगारांना या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आणि कामगार कपातीचा निर्णय मागे घेतला जाईपर्यंत आंदोलन सुरूचठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.सध्या या आंदोलनाकडे संपूर्ण पनवेल तालुक्याचे लक्ष लागले असून ओएनजीसीप्रशासनाची पुढील भूमिका काय असणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.



# सेवा संकल्प अभियानातून शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्याचा मानस –सभापती वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवसनिमित्त१७ सप्टेंबर ते दि. १७ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा संकल्प अभियानराबिवण्यात येत असून या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याचे मानस जिल्हा परिषद कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी व्यक्त केला.





पेणमध्ये एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प विभागाच्या वतीनेके.व्ही. बँक्वेट हॉल, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर येथे सेवा संकल्प अभियानाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संकल्प प्रचार व प्रसिद्धी रथाचे उदघाट्न जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार धैर्यशिल पाटील, जिल्हा परिषद कृषी सभापती वैकुंठ पाटील, जि.प. मुख्याधिकारी नेहा भोसले, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, तहसिलदार तानाजी शेजाळ, पंचायत समिती सदस्य कमळ पवार आदिंसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सभापती वैकुंठ पाटील यांनी सांगितले कि, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या २५ वर्षाच्या कारकीर्द मध्ये त्यांनी देशासाठी दिलेले योगदान व या योगदानाच्य माध्यमातून समाजाची केलेली सेवा यासाठी हा सेवा संकल्प अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यालामुंबई सोबत जोडण्यासाठी अटल सेतू सारखा प्रकल्प उभारण्यात आला असून यामुळे दळणवळण सुकर झाले आहे. या सेवा संकल्प माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची जनजागृती व्हावी या दृष्टीने लाभ मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम राबिवण्यात येत असून यामध्ये चित्रकला स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, अंगणवाडी सेविका सन्मान आदींसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सेवा, समर्पण, त्याग आणि बलिदान या भूमिकेतूनसमाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन हा सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत असून या माध्यमातून कोणताही घटक वंचित राहता कामा नये यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असे सभापती वैकुंठपाटील यांनी सांगितले.

माजी खासदार धैर्यशिल पाटील यांनी सांगितले कि, पंतप्रधान नरेंद्रजी मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त आदिवासी एकात्मिक प्रकल्पच्यावतीने आयोजित कार्यक्रमात आदिवासीसाठी विविध योजनांची माहिती या प्रचार रथाच्या माध्यमातून देण्यात येत असून मोदीजींच्या नेतृत्वाखाली विविध निर्णय घेण्यात येत असून याद्वारे आदिवासी बांधवाच्या दळी जमिनी लवकरच आदिवासी बांधवाच्या नावावर होणार असून या माध्यमातून आदिवासी समाजाचा सामाजिक, आर्थिक विकास साध्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आदिवासी प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी सेवा संकल्पअभियानाच्या माध्यमातून होणारे उपक्रम व आदिवासी समाजासाठी शासनाच्या योजनांचा प्रचार व प्रसार प्रचार रथाच्या माध्यमातून गावोगावी होणार असल्याचे सांगितले. यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध विभागाचे सहकार्य मिळत असल्याचे सांगून लवकरकएकत्मिकआदिवासी विकास प्रकल्पाचे कार्यालय उभारणीचे काम होणार असल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शासकीय लाभ मिळलेल्या आदिवासी संस्था, शेतकरी यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले.

# आज गौराईची होणार प्रतिष्ठापना; पूजनासाठी सुपांना मागणी वाढली

**तळा : प्रतिनिधी**

गौरी–गणपतीच्या सणाच्या श्रावण मासाला सुरूवात झाल्यापासून महिला वर्गात एक आनंदाचे वातावरण दिसत असून पारंपारिक पध्दतीने गाणी घेत नाचत ,फुगड्या नाचत गौराई साजरी केली आहे.गुरूवारी ज्येष्ठ गौरीचे उत्साहात आगमन झाले असून शुक्रवारी गौरी पूजनाचा सोहळा तालुक्यात रंगणार आहे.


संग्रहित छायाचित्र

तालुक्यातील प्रत्येक गावात अंदाजे दोन ते तीन ठिकाणी व शहरात आळीआळीत तर काही गावात एकाच ठिकाणी गौराईची प्रतिष्ठापना १८ सप्टेंबरला होणार आहे.गुरूवारी सायंकाळी महिलांनी आनंदाने गाणी म्हणत पत्री आणल्या यावेळी पारंपारिक महिलांचे खेळ गाण्यात महिला दंग होत्या यादिवशी महिला एकत्र येत असतात अशावेळी या महिलांमधे विचारांची देवाणघेवाण होत असते.तसेच कामात मग्न असणाऱ्या महिलाही त्यातून उसंत घेऊन या गौराई उत्सवात सामील होऊन आनंद घेत असतात.

यादिवसी ग्रामीण भागात विशेष म्हणजे मटणवडे,कोंबडी वडे,तर काही ठिकाणी शुध्द शाकाहारी मेजवानीचे असते,यावेळी शेजारी, नातेवाईक मंडळी, मित्रमंडळी एकत्रित बोलवली जावून सहभोजन केले जाते.शुक्रवारी सकाळ पासून महिला गौराई समोर सुप ओवसने तसेच माठाची भाजी व भाकरी,१६ प्रकारच्या भाज्या,१६ प्रकारच्या चटण्या,१६ प्रकारचे पक्वान्नेचे नैवेद्य दाखविले जातील व नंतर १२ वाजता आरती केली जाईल.

या पार्श्वभूमीवर गौरी पूजनासाठी आवश्यक असलेल्या सुप आणि सुपल्यांना बाजारात मोठी मागणी वाढली आहे.१७ सप्टेंबर रोजी सकाळ पासून दुपार पर्यंत महिलांची गर्दी बाजारात पहावयास मिळत आहे.तालुक्यात ग्रामीण भागासह तळा शहरापर्यंत विविध ठिकाणी सुप विक्रेत्यांनी दुकाने थाटली असून फेरीवाले ही गावोगावी फिरुन सुपे विक्री करत आहेत. पारंपरिक सुपांबरोबरच आकर्षक डिझाईन आणि नक्षीकाम केलेल्या सुपांना ग्राहकांची पसंती मिळाली आहे.

ग्रामीण जीवनात सुपाला विशेष महत्त्व आहे. घरगुती कामांसह शेतीमध्ये धान्य स्वच्छ करण्यासाठी सुपाचा वापर केला जातो. गौरी–गणपतीच्या सणात मात्र सुपाला धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व आहे. गौरी पूजनासाठी सवाष्ण महिला तसेच बालिकांकडून सुपांचा वापर केला जात असल्याने या काळात त्यांची मागणी वाढते. गौरी पूजनाच्या निमित्ताने नववधू माहेरहून सासरी विविध फळे व करंजी,पुरणपोली, मिठाई तसेच अन्य पदार्थांनी भरलेले सुप घेऊन येते. तसेच सासरच्या आप्तस्वकीयांना भरलेले सुप भेट देण्याची परंपराही अनेक भागात आहे. त्यामुळे गौरी आगमनापूर्वी सुप खरेदीसाठी महिलांची लगबग वाढल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे.

बाजारात सुपांची किंमत १५० ते २०० रुपये आहे. तर वेणीची डिझाईन, नक्षीकाम आणि सजावट असलेल्या सुपांची किंमत २०० ते ३०० रुपयांपर्यंत आहे. आकर्षक डिझाईनच्या सुपांना ग्राहकांकडून पसंती मिळत असल्याचे विक्रेत्यांनी म्हटले आहे.

# महिलेच्या हत्येप्रकरणी दोन जणांना अटक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण फाटा येथे महिलेची हत्या करून तिचा मृतदेह अर्धवट खड्ड्यात पुरून ठेवल्या प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी सुशील हिरेन आणि त्याचा मित्र रमेश तमस एक्का या दोघांना अटक केली. गव्हाण फाटा येथील वाहतूक पोलीस चौकीजवळ एका महिलेची हत्या करून तिचा मृतदेह नाल्यात पूरून ठेवल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या महिलेचा मृतदेह अर्धवट खड्यातून बाहेर काढून ताब्यात घेतला. तिच्या पतीनेच मित्राच्या मदतीने तिची हत्या केल्याचे पोलीस तपासात उघड झाले. पती सुशील हिरेन (राहणार गव्हाण फाटा ट्राफिक ऑफिस समोरील ब्रिज खाली, मुळगाव झारखंड, व्यवसाय भंगार गोळा करणे) याने त्याचा मित्र रमेश तमस एक्का याच्या मदतीने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन लाथाबुक्याने मारहाण करून तिच्या हत्या केली. प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीची ५७वी राष्ट्रीय स्पर्धा पनवेलमध्ये उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या गणिती कौशल्याला वेग, अचूकता आणि आत्मविश्वासाची जोड देणारी एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीची ५७वी नॅशनल कॉम्पिटिशन मुंबई विभागात पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अवघ्या पाच मिनिटांत शंभरहून अधिक बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकाराची उदाहरणे सोडवत गणिती कौशल्याचे दर्शन घडविले.




स्पर्धेत १२ सेंटरमधील तब्बल १२,७०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे परदेशातील विद्यार्थ्यांनीही ऑनलाइन पद्धतीने स्पर्धेत सहभाग नोंदविला. त्यामुळे या स्पर्धेला राष्ट्रीय स्तरासोबतच आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

या स्पर्धेतील विशेष उल्लेखनीय कामगिरी तिसरीतील विद्यार्थी सुमेध सुतार याने केली. त्याने अवघ्या पाच मिनिटांत तब्बल १८० बेरीज व वजाबाकीची उदाहरणे सोडवून उपस्थितांची दाद मिळविली.

कार्यक्रमास वस्तू व सेवा कर विभागाचे उपआयुक्त योगेश मनाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या गणिती कौशल्याचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी ॲड. मनोज कृष्णाजी भुजबळ नगरसेवक पनवेल महानगरपालिका, तसेच अर्चना रसाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक, सारिका मनोज ठाकरे, पत्रकार व आकाशवाणी मुंबईच्या वृत्तनिवेदक नम्रता कडू, सामाजिक कार्यकर्ते प्रथमेश पुंडे, सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक कपिल दांडगे आदी उपस्थित होते.

दुपारी १.३० वाजता झालेल्या पारितोषिक वितरण समारंभात स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. लहान गटात शिवांक पानसरे, सुमेध सुतार, गजेंद्र येडमल, प्रतीक दांडगे, अविनाश शेलार, अन्वी काकलीज, अथर्व कदम, अर्णव खळगे, आरोही सावंत आणि आरव चासकर यांनी चॅम्पियनचा मान पटकावला.

मोठ्या गटात वेदांत कोलेकर, अथर्व गायकवाड, मयुरेश लागरे, अनन्या गुंडेकर आणि आदित्य वाटाणे यांच्यासह विद्यार्थ्यांनी चॅम्पियनचा चषक पटकावला.

बेस्ट टीचर ॲवॉर्डने मोनाली खळगे, प्रियांका खुडे आणि नयना थिटे यांचा गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन रेशमा कळमकर यांनी केले. प्रास्ताविक प्रणिता पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन भारती वानखडे यांनी केले. स्पर्धेचे कामकाज रूपाली चासकर व मोनाली खळगे यांनी पाहिले.

# उरण तालुक्यातील करंजा बंदरात मासळीच्या घाऊक दरात घट

**उरण : प्रतिनिधी**

१५ ऑगस्ट पासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू झाला असून मागील महिनाभरात अनेक कारणांनी मासळी मिळत नव्हती मात्र सद्या उपवाचे दिवस संपल्या नंतर एकाच वेळी आलेल्या बोटीमुळे घाऊक मासळीच्या दरात घट झाल्याचा दावा मच्छिमारांनी केला आहे. त्यामुळे अधिकची मासळी येऊनही मच्छिमारांवर आर्थिक संकट आले आहे.

उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये, सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी–विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससूनडॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते. दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग– डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदीविक्रीला सुरुवात करण्यात आली आहे.यामुळे, नव्याने सुरू झालेल्या 'करंजा – द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर' येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.

यामध्ये, सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोलंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील अशा सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत. तर, करंजा येथील या बंदरात १०० रुपयांपासून १२०० रुपये किलोच्या दराने मासळी विक्री करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले आहे. तर, मासळी खरेदी करण्यासाठी अनेक व्यावसायिक देखील गर्दी करू लागले आहेत. करंजा बाजारात बला, वाम, पाला, माखली, मांदेली, ढोमी, पाकट, शिंगाला, चिंबोरी असे मासे देखील विक्रीसाठी असल्याचे दिसून आले आहे. तर, या मासळी बाजारात सुरमई, कोलंबी, कुपा, पापलेट, कलेट यांना अधिक मागणी आहे.

बोंबीलाचे दर घसरले : जून – जुलै महिन्यात किलोला २०० ते १५० रुपये दर आता बोंबील माशांची आवक वाढल्याने दर कमी होऊन तो प्रतिकिलो ५० रुपयांवर आले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य खवय्यांना याचा लाभ मिळत आहे.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त उरणमध्ये स्नेहभोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मानव सेवा संघ आणि महेश बालदी मित्र मंडळाच्या वतीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरण डाउरनगरे येथील रायगडजिल्हा परिषदेच्या शाळेत स्नेह भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

१७ सप्टेंबर रोजी झालेल्या या उपक्रमात परिसरातील आदिवासी व वनवासीबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन भोजनाचा आस्वाद घेतला.

गरजू ववंचित घटकांशी संवाद साधत त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण वाटून घेणे, हा याकार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. उरण मानव सेवा संघ आणि महेश बालदी मित्रमंडळाच्या या उपक्रमाचे स्थानिक नागरिक व उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यातयेत असून, सामाजिक बांधिलकी जपणारा हा स्नेह भोजनाचा कार्यक्रम अत्यंतउत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.











पनवेल : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि इतर मान्यवरांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते.




पनवेल : महापौर निवासस्थानी स्वच्छता दूतांचे हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख उपस्थित होते .



पनवेल : नगरसेवक राजू सोनी यांच्या निवासस्थानी स्थानापन्न श्रीगणेशाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले.



उरण : भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी कामगार नेते जितेंद्र घरत (चिर्ले) यांच्या गणपती बाप्पाचे दर्शन घेतले.



मंदार पनवेलकर, नवीन पनवेल






पनवेल, उरण : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी पत्नी शांताबाई भगत यांच्यासमवेत पंचायत समिती सभापती व कन्या रंजना वास्कर, जावई माजी सरपंच सदाशिव वास्कर (कुंडेवहाळ), शिवकुमार मढवी (चिर्ले), हरेश पाटील (नावडे), तुळशीदास मढवी (मोरावे) यांच्या निवासस्थानी स्थानापन्न बापांचे दर्शन घेतले. यावेळी स्वयंम मढवी, सानिया मढवी, सार्थक पाटील, संस्कृती पाटील, सायली वास्कर, श्रीयांश भगत आदी उपस्थित होते.




खालापूर : खोपोली नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी रिस येथे जाऊन खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे आणि जिल्हा परिषद सदस्य नेहा भूषण पारंगे यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.



पनवेल : खारघर येथील शिवनेरी महापौर निवासस्थानी विराजमान गणरायाचे नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी सहकुटुंब जाऊन दर्शन घेतले.




खारघर : पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर आणि अपूर्व प्रशांत ठाकूर यांनी भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा सचिव शुभ पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.



भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांचा केळवणे, पनवेल येथील बाप्पा

## संपादकीय

# ऊर्जा-सुरक्षेला प्राधान्य

रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टयांपर्यंत अतिरिक्त शुल्क लावण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना देणारे विधेयक अमेरिकेच्या प्रतिनिधीगृहाने मंजूर केले आहे. अशातऱ्हेचे विधेयक मंजूर होणे हे भारताच्या चिंतेत भर घालणारे असले तरी भारताची यासंदर्भातील भूमिका स्पष्ट आहे. देशाच्या १४० कोटी जनतेची ऊर्जा-सुरक्षा कोणत्याही बाह्य दबावापेक्षा महत्त्वाची आहे.

**भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे अमेरिकेला पसंत नसल्याने आता त्या संदर्भात आर्थिक दबाव आणण्याचा प्रयत्न अधिक तीव्र झाला आहे. अमेरिकन काँग्रेसने म्हणजे प्रतिनिधीगृहाने त्या संदर्भात विधेयक मंजूर करून या दबावाला कायदेशीर चौकट देण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. या विधेयकामुळे रशियन तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या देशांवर १०० टयांपर्यंत अतिरिक्त शुल्क लावण्याचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना मिळू शकतो, मात्र याचा अर्थ भारतावर लगेच १०० टक्के शुल्क लागू झाले आहे असा होत नाही. प्रतिनिधीगृहातील मंजुरीनंतर विधेयक आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या स्वाक्षरीच्या प्रतीक्षेत आहे. अशातऱ्हेचा कायदा मंजूर होणे हे भारताच्या चिंतेत भर घालणारे असले तरी भारताची या संदर्भातील भूमिका स्पष्ट आहे. देशाच्या १४० कोटी जनतेची ऊर्जा-सुरक्षा कोणत्याही बाह्य दबावापेक्षा महत्त्वाची आहे. परराष्ट्र मंत्रालयाने विधेयकाच्या मंजुरीची दखल घेतली असून भारताने अमेरिकेशी गेल्या काही महिन्यांत या विषयावर उच्चस्तरीय चर्चा केली असल्याचे स्पष्ट केले आहे. भारताने स्वतःच्या व्यापार आणि आर्थिक हितसंबंधांच्या संरक्षणासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्याचा निर्धारही व्यक्त केला आहे. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार आहे. रशिया हा भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीतील अत्यंत महत्त्वाचा पुरवठादार बनला आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताच्या कच्च्या तेलाच्या एकूण आयातीपैकी सुमारे ३०.३ टक्के हिस्सा रशियाचा होता. रशियन तेलाची तुलनेने कमी असलेली किंमत आणि उपलब्धता यामुळे भारताच्या आयात खर्चावरही त्याचा परिणाम झाला आहे. भारताने यापूर्वीच आपला तेलपुरवठा अनेक देशांतून मिळवण्याचे धोरण स्वीकारले आहे. रशियावरील अवलंबित्व कमी करण्याची गरज निर्माण झालीच, तर आखाती देश, अमेरिका, दक्षिण अमेरिका तसेच इतर उत्पादकांकडून खरेदी वाढवता येऊ शकते, मात्र त्याची किंमत, वाहतूक, आणि उपलब्धता यांचा अंतिम परिणाम महत्त्वाचा असेल. विशेषतः जागतिक बाजारात पुरवठा घटला तर रशियन तेलाची जागा लगेच दुसऱ्या स्रोतांनी भरून काढणे महाग ठरू शकते. अमेरिकी विधेयकामुळे भारतात पेट्रोलच्या किमती तत्काळ वाढणार आहेत असे म्हणणे चुकीचे ठरेल. पेट्रोल-डिझेलचे दर आंतरराष्ट्रीय बाजाराशी निगडित आहेत आणि आंतरराष्ट्रीय तेलाचे दर, रुपया-डॉलर विनिमय दर, कर, वाहतूक व इतर खर्च यांचा त्यावर परिणाम होत असतो, मात्र भविष्यात रशियन तेलाचा पुरवठा मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि त्याऐवजी अधिक महाग असे कच्चे तेल दुसऱ्या देशाकडून घ्यावे लागले, तर भारतीय तेल कंपन्यांच्या खर्चात वाढ होऊ शकते. त्याचा परिणाम अखेरीस पेट्रोल-डिझेलच्या दरांवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही, पण आजच्या घडीला अमेरिकेच्या विधेयक मंजुरीतून लगेच दरवाढ संभवत नाही. भारताने त्यामुळे भावनिक प्रतिक्रिया न देता आपल्या राष्ट्रीय हिताचा मार्ग निवडणे आवश्यक आहे. मित्रदेशांशी संबंध महत्त्वाचे असले तरी भारताची ऊर्जा-सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि सामान्य नागरिकांना परवडणारे इंधन यांना सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे. अमेरिकेच्या दबावाला सामोरे जाताना संवादाचे दरवाजे खुले ठेवत, तेलाच्या पुरवठ्याचे विविध पर्यायी स्रोत तयार ठेवत आणि आपल्या आर्थिक हितांचे संरक्षण करत पुढे जाणे हीच भारताच्या स्वतंत्र परराष्ट्र आणि आर्थिक धोरणाची खरी कसोटी आहे.**

# सामजिक ऐक्याची परंपरा असलेला गणेशोत्सव



अलिबाग शहरात मोजकेच सार्वजनिक गणेशोत्सव साजरे केले जातात. त्यापैकी बाजारपेठेतील सन्मित्र गणेशोत्सव मंडळ हे हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा असलेला गणेशोत्सव मंडळ म्हणून ओळखले जाते. या मंडळाचे पहिले अध्यक्ष पापाभाई पठाण होते. एका मुस्लिम व्यक्तीने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्षपद भूषविल्याने मंडळाच्या स्थापनेपासूनच हिंदू-मुस्लिम सामजिक ऐक्याचा संदेश समाजापुढे गेला. आपली स्वतंत्र ओळख या मंडळाने निर्माण केली आहे.

ज्या विभात हा गणेशोत्सव साजारा केला जातो तेथे मुस्लीम वस्ती आहे. गुजराती, मारवाडी व्यापरी आहेत. बाजूला कोळीवाडा आहे. शेजारी दलित वस्ती आहे. हे सर्वजण एकत्र येऊन गणेशोत्सव साजरा करतात. गणेशोत्सवाच्या काळात सर्वधर्मीय नागरिक आणि व्यावसायिक उत्साहाने सहभागी होतात. धार्मिक विविधतेतून सामाजिक एकात्मता जपण्याची ही परंपरा पुढील पिढ्यांनीही जपली. गणेशोत्सवाचे स्वरूप बदलत असताना परंपरा आणि आधुनिक सामाजिक भान यांची सांगड घालण्याचा प्रयत्न सन्मित्र गणेशोत्सव मंडळाकडून केला जात आहे. सामजिक ऐक्य राखले जात आहे. देखणी गणेशमूर्ती, आकर्षक आणि नयनरम्य देखावे, धार्मिक कार्यक्रम तसेच पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघणारी भव्य विसर्जन मिरवणूक ही या उत्सवाची वैशिष्ट्ये ठरली आहेत.

हा गणेशोत्सव अलिबागमधील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणून ओळखला जातो. सन्मित्र गणेशोत्सव मंडळाने यंदा ६५ वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. केवळ धार्मिक उत्सवाचे आयोजन न करता सामाजिक सलोखा, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणारे मंडळ म्हणून सन्मित्र गणेशोत्सव मंडळाने अलिबागच्या सांस्कृतिक पटलावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

विशेष म्हणजे या मंडळाच्या स्थापनेपासूनच हिंदू-मुस्लिम ऐक्याची अनोखी परंपरा जपली जात असून आज ६५ वर्षांनंतरही ती तितक्याच उत्साहाने कायम आहे. या मंडळाने ६५ वर्षांच्या प्रवासात अलिबागच्या सांस्कृतिक पटलावर आपले एक आदराचे व विशेष स्थान निर्माण केले आहे. मंडळाने कायमस्वरूपी फायबरची पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती तयार करून तिची प्रतिष्ठापना करण्याचा निर्णय घेतला. हा एक वेगळा संदेश दिला गेला आहे.

गणेशोत्सव म्हणजे केवळ मनोरंजन आणि धार्मिक कार्यक्रम नव्हे, तर समाजासाठी काहीतरी करण्याची संधी ही भूमिका सन्मित्र गणेशोत्सव मंडळाने कायम ठेवली आहे. यंदाच्या गणेशोत्सवात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नेत्रचिकित्सा, मुख्यमंत्री हेल्थ चेकअप कॅम्प तसेच जिल्हा रुग्णालयाच्या माध्यमातून नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिक एकत्र येतात. या संधीचा उपयोग सामाजिक आणि आरोग्यविषयक जनजागृतीसाठी व्हावा या उद्देशाने हे उपक्रम आयोजित करण्यात येतात.

आधुनिक काळातील बदलत्या उत्सव पद्धतीसोबत सन्मित्र मंडळाने आपल्या पारंपरिक धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचीही जपणूक केली आहे. गणेशोत्सवातील भजन परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने आणि उत्साहाने सुरू आहे. भक्तिमय वातावरणात होणाऱ्या भजन कार्यक्रमांमुळे उत्सवाला पारंपरिक सांस्कृतिक रंग प्राप्त होतो. नव्या पिढीला आपल्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांची ओळख व्हावी यासाठी अशा उपक्रमांना महत्त्व दिले जाते. गणेशोत्सवाच्या काळात बाजारपेठेत निर्माण होणारे उत्सवी वातावरण, नागरिकांचा सहभाग आणि पारंपरिक पद्धतीने साजरा केला जाणारा उत्सव यामुळे या मंडळाने अवेगळे स्थान निर्माण केले आहे.

पहिल्या अध्यक्षपदापासून सुरू झालेली हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा, सर्वधर्मीयांचा सहभाग, पर्यावरणपूरक गणेशमूर्तीचा स्वीकार, भजनासारख्या पारंपरिक उपक्रमांचे जतन आणि आरोग्यविषयक सामाजिक उपक्रम या माध्यमातून मंडळाने उत्सवाला व्यापक सामाजिक आशय दिला आहे. बदलत्या काळात गणेशोत्सवाचे स्वरूपही बदलत असताना परंपरा आणि आधुनिक सामाजिक भान यांची सांगड घालण्याचा प्रयत्न सन्मित्र गणेशोत्सव मंडळाकडून केला जात आहे.

# माहेरवाशिण गौरी आणि कोकणातील परंपरा

गणेशोत्सवाच्या धामधुमीत ज्येष्ठ गौरीचे आगमन म्हणजे घरातील आनंदाला आलेला उधाण. गौरीला कोकणात अन् संपूर्ण महाराष्ट्रात 'माहेरवाशिण' मानले जाते. वर्षातून एकदा आपल्या लाडक्या माहेरी येणाऱ्या या कन्येचे स्वागत करण्यासाठी संपूर्ण कुटुंब सज्ज होते.

**निसर्गाच्या रूपाने आगमन आणि आवाहन**

कोकणात गौरी आणण्याची पद्धत अतिशय निसर्गरम्य आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. अनेक ठिकाणी नदीकाठची किंवा विहिरीच्या बाजूची खडे (गोटे), वनस्पती किंवा तेरड्याची रोपे एकत्र करून गौरीचे प्रतीक म्हणून घरी आणले जाते. नदीवरून किंवा पाण्याच्या स्त्रोतावरून गौरी आणताना ताशांचा गजर, लेझीम आणि मांगल्याचे सूर उमटतात. 'गौरी ग आली, सोन्याच्या पावलांनी आली, आरोग्याच्या पावलानी आली' अशा घोषणा देत तिचे गृहप्रवेश होते.

**मुख्य पूजन आणि महाप्रसाद**



गौरी आवाहनानंतर शुक्रवारी मुख्य पूजनाचा दिवस असतो. या दिवशी गौरीला अत्यंत सुंदर साडी, दागदागिने, आणि फुलांनी सजवले जाते. कोकणात गौरीच्या नैवेद्याला विशेष महत्त्व आहे. या दिवशी पारंपरिक पद्धतीने बनवलेली 'घावन-घाटले', खीर-पुऱ्या, किंवा १६ ते २१ प्रकारच्या भाज्यांचा नैवेद्य दाखवला जातो. समुद्रकिनाऱ्यालगतच्या काही भागांत प्रथेनुसार या दिवशी मांसाहारी किंवा माशांचे नैवेद्य दाखवण्याचीही जुनी परंपरा आहे.

**लोकसंस्कृती आणि जिव्हाळा**

गौरीच्या निमित्ताने कोकणातील घराघरांमध्ये रात्री जागरण केले जाते. स्त्रिया एकत्र येऊन 'गौरीची गाणी' गातात, फुगड्या खेळतात आणि पारंपरिक खेळ सादर करतात. हा सण महिलांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा ठरतो. थोडक्यात सांगायचे, तर कोकणातील गौरी सण म्हणजे निसर्गपूजा, समृद्धीची कामना आणि कौटुंबिक नात्यांची वीण घट्ट करणारा सोहळा आहे. माहेरवाशिणीच्या रूपात आलेल्या या गौरीच्या पूजनाने प्रत्येक घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदो, हीच या मागची सदिच्छा असते.

(साभार इंटरनेट)




## 'ओप्पो'चा बजेट स्मार्टफोन के१४ लाईटची भारतात एन्ट्री

चिनी तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी ओप्पोने भारतीय बाजारात आपली लोकप्रिय के१४ सिरीज विस्तारत नवा बजेट-फ्रेंडली स्मार्टफोनओप्पो के१४ लाईट अधिकृतपणे लॉन्च केला आहे. काही दिवसांपूर्वीच भारतीय मानके ब्युरोच्या वेबसाइटवर दिसलेला हा स्मार्टफोन आजपासून देशभरात विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे.



दमदार ७०००mAh बॅटरी, १२०Hz रिफ्रेश रेट आणि आकर्षक 'टेक्चर फेदर' बॅक पॅनेल ही या फोनची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. कंपनीने हा फोन सध्या एकाच व्हेरियंटमध्ये (४ जीबी रॅम, ६४ जीबी स्टोरेज) लॉन्च केला आहे. या फोनची मूळ किंमत १६ हजार ९९९ रुपये इतकी आहे. लॉन्च ऑफरअंतर्गत कंपनी ग्राहकांना १,००० रुपयांची इन्स्टंट सूट मिळत आहे. त्यामुळे हा फोन १५ हजार ९९९ मध्ये खरेदी करता येईल. हा फोन ३ महिन्यांच्या नो-कॉस्ट ईएमआयवरही उपलब्ध करून देण्यात आला आहे. हा फोन ओप्पोच्या अधिकृत ई-स्टोअरसह प्रसिद्ध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म फ्लिपकार्ट वर विक्रीसाठी उपलब्ध आहे. ग्राहकांसाठी 'स्टोन ब्राऊन' आणि 'फेदर पर्पल' या दोन आकर्षक रंगांचे पर्याय देण्यात आले आहेत.

डिस्प्ले : फोनमध्ये ६.७५ इंचाचा HD+ LCD डिस्प्ले देण्यात आला आहे, जो १२०Hz रिफ्रेश रेट आणि ७२० x १५७० पिक्सल्स रिझोल्यूशनला सपोर्ट करतो. ९०० निट्स पीक ब्राइटनेस असलेल्या या स्क्रीनमध्ये स्प्लॅश टच, ऑइली हँड टच आणि ग्लव्ह टच तंत्रज्ञान समाविष्ट आहे.

कॅमेरा : फोटो आणि व्हिडिओसाठी बॅक पॅनेलवर १३MPचा मुख्य कॅमेरा आणि फ्रंटला ५MPचा सेल्फी कॅमेरा मिळतो. कॅमेरा ॲपमध्ये एआय (AI) आधारित पोर्ट्रेट, नाईट मोड आणि टाइम-लॅप्स हे फीचर्स उपलब्ध आहेत.

बॅटरी व कनेक्टिव्हिटी : फोनमध्ये ७०००mAhची प्रचंड बॅटरी असून १५W वायर्ड फास्ट चार्जिंगची सुविधा आहे. फोनला धूलिरोधक व जलरोधकतेसाठी IP६४ रेटिंग मिळाले असून ड्युअल सिम, वाय-फाय आणि ब्लूटूथ हे कनेक्टिव्हिटी पर्याय उपलब्ध आहेत.

प्रोसेसर व सॉफ्टवेअर : स्मार्टफोनमध्ये 'Unisoc T७२५०' ऑक्टाकोर प्रोसेसर असून हा फोन अँड्रॉइड १६वर आधारित ColorOS १६ या ऑपरेटिंग सिस्टमवर चालतो.

# 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत


शिवाजी सावंत : (३१ ऑगस्ट १९४०-१८ सप्टेंबर २००२). ख्यातनाम मराठी कादंबरीकार. संपूर्ण नाव शिवाजी गोविंदराव सावंत. जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा येथे. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजऱ्यालाच झाले. प्रथम वर्ष बी.ए.पर्यंत शिक्षण घेऊन पुढे वाणिज्य शाखेतून पदविका घेतली. त्यानंतर कोल्हापूरच्या 'राजाराम प्रशाले'त त्यांनी अध्यापन केले (१९६२-७४). १९७४मध्ये ते पुण्यास स्थायिक झाले. तेथे महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणखात्याच्या लोकशिक्षण ह्या मासिकाचे संपादक म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १९८३मध्ये या मासिकाच्या संपादक पदावरून त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली.




**निमित्त**

'राजाराम प्रशाले'त अध्यापन करीत असतानाच त्यांनी मृत्युंजय (१९६७) ही आपली पहिली कादंबरी लिहिली. हिंदीतील केदारनाथ मिश्र ह्यांचे कर्ण आणि रामधारी सिंह 'दिनकर' ह्यांचे रश्मिरथी ह्या दोन खंडकाव्यांचा त्यांनी मृत्युंजयच्या प्रस्तावनेत कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे. ह्या कादंबरीत कर्णाच्या अंतरंगात शिरून त्याच्या मनोविश्वाचा शोध घेण्याचा प्रगल्भ प्रयत्न त्यांनी केला आहे. महाभारताच्या विराट विश्वातून कर्णाला त्याच्या दुःखी, यातनामय आयुष्याला त्याच्या अनेक संदर्भांसह वेगळे करून त्यांनी त्याची प्रतिमा साकारली आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ही प्रकाशमय बाजू त्यांनी समर्थपणे मांडली. ह्या कादंबरीला वाचकांचा फार मोठा प्रतिसाद मिळाला. त्यांच्या ह्या पहिल्याच कादंबरीने प्रभावी कादंबरीकार म्हणून त्यांची प्रतिमा प्रस्थापित झाली. बहुतेक भारतीय भाषांतून ती अनुवादिली गेली. तिचा इंग्रजी अनुवादही झाला आणि मृत्युंजयकार ही उपाधीही त्यांना लाभली. छावा (१९७९) आणि युगंधर (२०००) ह्या त्यांच्या त्यानंतरच्या कादंबऱ्या. छावा ही संभाजी महाराजांच्या जीवनावरची, तर युगंधर ही भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावरची कादंबरी आहे. भव्योदात्त जीवनांबद्दल त्यांना वाटणारा आदर मृत्युंजय ते युगंधर पर्यंतच्या त्यांच्या तीनही कादंबऱ्यांमधून उत्कटपणे प्रकट होतो. छावामध्ये जनमानसात संभाजी महाराजांबद्दल निर्माण झालेली नकारात्मक स्वरूपाची प्रतिमा पुसून त्या जागी औरंगजेबाने दिलेल्या क्रूर मृत्युदंडाच्या शिक्षेला धीरोदात्तपणे सामोरे जाणारे, आपले राजेपद जबाबदारीने आणि विवेकाने सांभाळणारे संभाजी महाराज ते उभे करतात. त्यासाठी संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीचा ते मानसशास्त्रीय अंगाने विचार करतात. जीवनमूल्य नष्ट होत असताना आणि त्यामुळे सामाजिक विघटनाचा अनुभव येत असताना भारतीय मिथकांचा आणि इतिहासाचा आधार घेऊन मानवी जीवनातील आत्मिक शक्तींचा त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून पुरस्कार केला. मृत्युंजय आणि छावा ह्या कादंबऱ्यांची नाट्यरूपेही त्यांनी निर्माण केली. गोवा येथे हृदयविकाराच्या झटक्याने ते निधन पावले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या जन्मगावी श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर यांच्या वतीने 'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत कादंबरीपुरस्कार' प्रतिवर्षी दिला जातो. तसेच पुणे येथे मृत्युंजय प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले आहे. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर



## वजन कमी करण्यासाठी झुणका-भाकर फायद्याची!

आजकाल वजन कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन करतात. अत्यंत महागातले पदार्थ खाऊनच वजन कमी करता येते असा अनेकांचा समजदेखील असतो. मात्र महाराष्ट्रातल्या घराघरात बनणाऱ्या झुणका-भाकरीनेदेखील वजन कमी करता येते. याबद्दल तुम्हाला कल्पना आहे का? जाणून घेऊया झुणका-भाकर खाण्याचे फायदे...

१. झुणक्याचे फायदे : झुणका भाकर सेवनाने आपल्याला उत्तम दर्जाची संपूर्ण प्रोटिन्स तर मिळतातच. शिवाय भरपूर कॅलरीजही उपलब्ध होतात. धान्य व डाळीच्या योग्य अशा मिश्रणाने उदा. ३-१ या प्रमाणात तर आपल्याला उत्तम जैविक मूल्य असलेली प्रोटिन्स मिळतात.

२. भाकरीचे फायदे: ज्वारीची भाकरी, हे धान्य व बेसनचा झुणका ही डाळ ! यापासून मिळणाऱ्या प्रोटिन्सचा दर्जा मांसाहारी प्रोटिन्स इतकाच उत्तम आहे.

३. पचनक्रिया सुधारते : भाकरीमध्ये फायबर असल्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठता टाळता येते.

४. रोगप्रतिकारशक्ती वाढते: कांदा आणि लसणामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते.

५.शरीराला थंडावा मिळतो:आयुर्वेदामध्ये नाचणीला थंड मानले जाते. त्यामुळे उन्हाळ्यात नाचणीची भाकरी खाणे फायद्याचे ठरते.

६.स्वस्त आणि घरगुती उपाय: हा महाराष्ट्रातील एक पारंपरिक आणि स्वस्त पदार्थ आहे, जो कमी खर्चात शरीराला आवश्यक पोषण प्रदान करतो.

७. मधुमेहासाठी उपयुक्त: नाचणीसारख्या धान्यांच्या भाकरीमध्ये फायबर जास्त असल्याने रक्तातील

८. हाडांसाठी फायदेशीर: नाचणीमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे हाडांचे आरोग्य सुधारते. झुणका-भाकर हे एक पौष्टिक, स्वादिष्ट आणि परवडणारे महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थ आहे. याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत, ज्यामुळे ते आपल्या आहारात नक्कीच समाविष्ट करायला हवे.

## पनवेल महानगरपालिकेतर्फे

# सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ

### विविध सामाजिक उपक्रमांद्वारे महिनाभर अभियान राबविणार -महापौर नितीन पाटील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सगळे जीवन देशाप्रती समर्पित केले आहे. त्यांच्या संविधानिक पदावरील कारकिर्दीला २५ वर्षे पुर्ण झाल्यानिमित्त पनवेल महानगरपालिकेच्या वतीने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या एक महिन्याच्या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी सांगितले. छ.संभाजी मैदानावर या अभियानाचा शुभारंभ आज गुरुवार दिनांक १७ सप्टेंबर रोजी त्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

उद्घाटनप्रसंगी उपमहापौरप्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक सर्वश्री गणेश कडू, सुमित झुंजारराव, कुसूम म्हात्रे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त रविकिरण घोडके, मुख्य लेखा वित्तअधिकारी पुनम पाटील,लेखाधिकारी संग्राम व्होरकटे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉक्टर राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, भाडांर विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय प्रतीकांची मानवी रांगोळी साकारण्यात आली. तसेच अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देणाऱ्या फलकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत आज पनवेल महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी भारताच्या नकाशाची भव्य मानवी रांगोळी साकारून देशभक्तीचा संदेश दिला. तसेच पनवेल महानगरपालिकेच्या उर्दू शाळा व दि.बा पाटील इंग्लीश मिडीयम शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'सत्यमेव जयते, विकसित भारत २०४७' यावर आकर्षक मानवी रांगोळी साकारत विकसित भारताचे स्वप्न अधोरेखित केले.

महापौर नितीन पाटील यांनी शालेय विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. दरम्यान शालेय विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत शुभेच्छा पोहोचविण्याच्या उद्देशाने महापौर नितीन पाटील यांना पुष्पगुच्छ प्रदान केला.

या अभियानांतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांचा विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने 'सेवा माझे योगदान' या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यामध्ये नाट्यगृहात मेळावा आयोजित करण्यात येणार असून दहा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल. यात आरोग्य तपासणी शिबिर, ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता, मतदार जागृती, महिला आरोग्य काळजी यांसह विविध सामाजिक विषयांवर उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

महानगरपालिकेच्या संबंधित विभागांच्या माध्यमातूनही 'सेवा, माझे योगदान' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. पर्यावरण विभागामार्फत वृक्षलागवड, घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नागरी स्वच्छता उपक्रम, तर आरोग्य विभागामार्फत रक्तदान शिबिर अशा विविध उपक्रमांचा त्यामध्ये समावेश असेल. अभियानाचा समारोप १६ ऑक्टोबर २०२६ रोजी 'सेवा ज्योत यात्रा' समारंभाने होणार आहे. या यात्रेत बाईक रॅलीचा समावेश असेल. त्यानंतर नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्यांचा सन्मान व बक्षिसांचे वितरण करण्यात येणार असून, महापालिकेच्या सेवा प्रमाणपत्रांचेही वितरण केले जाणार आहे.

## गणेश विसर्जनासाठी पनवेलमध्ये वाहतूक मार्गात बदल

### पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

गणेश विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी पनवेल, खांदा कॉलनी आणि नवीन पनवेल परिसरातील काही मार्गांवर वाहतूक बदल जाहीर केले आहेत. संबंधित मार्गांवर सकाळी १० वाजल्यापासून विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत वाहतूक बंद किंवा वळविण्यात येणार आहे.

पनवेल शहर वाहतूक शाखेच्या हद्दीत सावरकर चौक ते वडाळे तलाव (नागफणी) तसेच वडाळे तलावाकडून सावरकर चौकाकडे येणाऱ्या मार्गावर वाहतुकीस प्रवेशबंदी करण्यात आली आहे. वाहनचालकांनी सावरकर चौककोर्ट रोडसहस्त्रबुद्धे हॉस्पिटल रोडठाणा नाका रोड या पर्यायी मार्गाचा वापर करावा.

तसेच राम स्नॅक्स कॉर्नर ते वडाळे तलाव हा मार्ग बंद राहणार असून वाहनचालकांनी राम स्नॅक्स कॉर्नर, अशोक गार्डन ,देशमुख गल्ली, सावरकर चौक या मार्गाने पुढे जावे.

**खांदा कॉलनीतही वाहतूक बदल**

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत खांदा कॉलनी परिसरातील गणेश विसर्जन मार्गांवर वाहतूक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्रिमूर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था, सेक्टर ८ येथून महात्मा स्कूलकडे जाणारा मार्ग तसेच श्रीकृपा बँक्वेट हॉल, सेक्टर ६ येथून खांदेश्वर तलावाकडे जाणारा मार्ग गणेश वाहन व ट्रॉलीसाठी बंद राहणार आहे.

एक्सिस बँकेकडून खांदेश्वर तलावाकडे जाणाऱ्या वाहनांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून डावीकडे वळून पुढे जावे. तसेच आसूडगावकडून एक्सिस बँकेकडे येणाऱ्या वाहनांनी आगरी शिक्षण संस्था शाळा, सेक्टर ६, खांदा कॉलनी परिसरातील पर्यायी मार्गाचा वापर करावा.

**नवीन पनवेलमध्ये आदई तलावाकडे जाणाऱ्या मार्गावर निर्बंध**

नवीन पनवेल परिसरात आदई सर्कलसेक्टर १०आदई तलाव हा प्रमुख विसर्जन मार्ग राहणार आहे. तुलसी हाईट्स, सेक्टर ५ येथून भावना मेडिकलकडे जाणाऱ्या मार्गावर प्रवेशबंदी करण्यात आली आहे.

सेक्टर ५, ६ आणि ७ मधील नागरिकांनी आदई सर्कलकडे जाण्यासाठी नॅशनल कॉम्प्लेक्स नोंदणी कार्यालय डी-मार्ट एचडीएफसी चौक या मार्गाचा वापर करावा. खांदा कॉलनीकडून येणाऱ्या वाहनांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपुलानंतर पोलीस प्लॉटसेंट जोसेफ स्कूलसेक्टर ७ ,सेवेज पंप हाऊसनोंदणी व मुद्रांक कार्यालयडी-मार्ट एचडीएफसी सर्कल या पर्यायी मार्गाने इच्छित स्थळी जावे.

या दिवशी वाहतूक निर्बंध गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर १८ सप्टेंबरला पाच दिवसांचे गणपती, १९ सप्टेंबरला सहा दिवसांचे गणपती व गौरी, २० सप्टेंबरला सात दिवसांचे गणपती, २३ सप्टेंबरला दहा दिवसांचे गणपती आणि २५ सप्टेंबरला अनंत चतुर्दशीचे विसर्जन होणार आहे. या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून मिरवणूक संपेपर्यंत संबंधित मार्गांवर निर्बंध लागू राहतील. तसेच ३० सप्टेंबर रोजी केवळ पनवेल शहर वाहतूक शाखेच्या हद्दीत वाहतूक बदल लागू राहणार आहेत.विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## खारघरमध्ये दाम्पत्याला मारहाण; आयफोन लंपास

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमध्ये पहाटेच्या सुमारास दाम्पत्याला दगडाने मारहाण करून त्यांच्याकडील सुमारे ९५ हजार रुपये किमतीचा आयफोन १५ प्रो मॅक्स लंपास केल्याची घटना घडली. याप्रकरणी खारघर पोलिसांनी रबिलाल रोबन टुडू (वय ३२) याला अटक केली आहे.

कोपरा गावाच्या पुढे, खारघर टोलनाक्याजवळ गणपती तलावाकडे जाणाऱ्या पादचारी पुलावर ही घटना घडली. तक्रारदार प्रगती सुरेश घंगाळे ऊर्फ प्रगती रोहन खिलारी (वय २९) आणि त्यांचे पती रोहन खिलारी हे तेथून जात असताना एका अनोळखी व्यक्तीने त्यांना दगडाने मारहाण केली.त्यानंतर आरोपीने दाम्पत्याकडील ९५ हजार रुपये किमतीचा आयफोन १५ प्रो मॅक्स घेऊन घटनास्थळावरून पलायन केले.

घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी तपास सुरू करून आरोपी रबिलाल टुडू याला अटक केली. याप्रकरणी पुढील तपास खारघर पोलीस करीत आहेत.

## मानवी हक्क संरक्षण फेडरेशनतर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर



**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवाला सामाजिक उपक्रमांची जोड देत मानवी हक्क संरक्षण फेडरेशनच्या वतीने यंदा सर्वधर्मसमभाव, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्य जनजागृतीवर भर देण्यात आला. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. मुनीर तांबोळी यांच्या संकल्पनेतून दीड दिवसांचा गणेशोत्सव विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

या उपक्रमाची पाहणी करत पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी फेडरेशनच्या सामाजिक उपक्रमांची माहिती घेत डॉ. मुनीर तांबोळी यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

गणेशोत्सवाच्या काळात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी दर्शनासाठी येणाऱ्या पाहुण्यांना शाल आणि तुळशीचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले. 'झाडे लावा, झाडे जगवा' तसेच निसर्ग संवर्धनाचा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

दरम्यान, फ्युचर हाईट, यश हॉस्पिटलजवळ, उरण नाका येथील फेडरेशनच्या मध्यवर्ती कार्यालयात व्हाईट लोटस हॉस्पिटल, रोडपाली यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये रक्तदाब, रक्तातील साखर, बीएमआय, डोळे तपासणी, रक्त तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला देण्यात आला. परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

गणरायाच्या दर्शनासाठी भाजप कामगार नेते प्रभुदास भोईर, काँग्रेस नेते राज सदावर्ते, राकेश जाधव, सुधीर पवार, उद्योजक उबेद पवार, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, समाजसेवक सचिन पाटील, मनोज पाटील, रीना मोरे यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि पोलीस प्रशासनातील मान्यवर उपस्थित होते.

दीड दिवसांच्या पूजेनंतर गणरायाला वाजत-गाजत निरोप देण्यात आला..हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय कार्याध्यक्ष अबरार मास्टर, राष्ट्रीय सचिव गुरदीप सिंह, महाराष्ट्र महिला अध्यक्ष रत्नप्रभा गोमासे, महाराष्ट्र सचिव निलेश भगत, विकास पाटील, मुद्दसिर पटेल, किरण अढागले, नेहा किरनली, मुग्धा लाटकर, पूनम नागटिळक, प्रतिम पाटील, मंगल भारवड, विपुल बाबरे आणि कार्यालयीन प्रमुख सूरज नागे आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निवडक

### गळ्यातील सोन्याच्या बदामची चोरी

**नवीन पनवेल :** मुलाच्या गळ्यातील दीड ग्राम वजनाचे सोन्याच्या बदामाची चोरी केल्याप्रकरणी महिलेविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.१५ सप्टेंबर रोजी रात्री पावणे नऊच्या सुमारास फिर्यादी आणि त्यांचा मुलगा व त्यांच्या बहिणीची मुलगी हे नेत्रावती बिल्डिंग, करंजाडे येथे बाजारसाठी गेले होते. यावेळी चाळीस वर्षीय महिलेने त्यांच्या मुलाच्या गळ्यातील सोन्याच्या बदामाची चोरी केली.

### कारची काच फोडून पाच लाखांची चोरी

**नवीन पनवेल** : कारची काच फोडून आतमधील पाच लाख रुपयांची चोरी केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात चोराविरोधात १५ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आलम किस्मतअली कंकाली हे तळोजा फेस वन येथे राहत असून त्यांनी त्यांची कार जेडब्ल्यू एल कंपनी जेएनपीटी हायवे पाडेकर, गव्हाण फाटा येथे पार्क करून ते वॉशरूमला गेले होते. यावेळी कारची काच फोडून चोराने डॅश बोर्डाच्या लगत असलेल्या ड्रॉवर मधील पाच लाख रुपये चोरून दिले.

### ट्रकचालकाकडून मालाचा अपहार

**नवीन पनवेल :** १६ लाख ८३ हजार रुपयांचा माल अहिल्यानगर येथे न पोहोचवता त्या मालाचा अपहार केल्याप्रकरणी ट्रक चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १५ सप्टेंबर रोजी पुन्हा दाखल करण्यात आला. मुकेश मोरा यांचे मॅनेजर पवन कुमार पांडे यांनी त्यांचे ग्राहक वैष्णवी ट्रान्सपोर्टचे मालक अजय दहिफळे यांनी पाठवलेल्या ट्रकमध्ये १६ लाख ८३ हजार रुपये किमतीचा स्टीलचा माल ट्रक चालकाकडे सोपवला होता. यावेळी त्यांनी तो माल अहिल्यानगर येथे न पाठवता त्या मालाचा अपहार केला.

### ४० लाख ९८ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** ४० लाख ५८ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चौघाविरोधात खांदेश्वर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी बाळकृष्ण धडंबे यांनी बनावट बीले तयार करुन त्यांचे पेमेंट करण्यासाठी खोटे चेक बनवून खोट्या सह्या करून लेजरला नोंदी केल्या.

## पनवेल महापालिका मुख्यालयात प्रबोधनकार ठाकरे जयंतीनिमित्ताने अभिवादन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज गुरुवार दि. १७ सप्टेंबर रोजी केशव सीताराम ठाकरे उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



प्रबोधनकार ठाकरे हे महाराष्ट्रातील प्रख्यात समाजसुधारक, पत्रकार, लेखक, वक्ते आणि समाजप्रबोधनकार म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या लेखणीच्या आणि प्रभावी वक्तृत्वाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, सामाजिक विषमता आणि कालबाह्य रूढी-परंपरांविरोधात जनजागृती केली. त्यांच्या निर्भीड लेखनातून आणि परखड विचारांतून सामाजिक सुधारणेचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचला. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि वैचारिक चळवळीच्या इतिहासात प्रबोधनकार ठाकरे यांचे कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते.

त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना समाजातील विषमता दूर करण्यासाठी तसेच विवेक, समता आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये जपण्यासाठी त्यांच्या विचारांचे स्मरण यावेळी करण्यात आले.

यावेळी महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक गणेश कडू, सुमित झुंजारराव, कुसूम म्हात्रे, तसेच परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मॉडेल कंचन कश्यप मृत्यूप्रकरणी विवाहित प्रियकरावर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

मॉडेलिंग क्षेत्रात कार्यरत असलेल्या २६ वर्षीय कंचन कश्यप हिच्या मृत्यू प्रकरणाला काही महिन्यांनंतर नवे वळण मिळाले आहे. कंचनच्या मोबाईलमधील व्हॉट्सअ‍ॅप चॅट्स, विवाह प्रमाणपत्र तसेच अन्य कागदपत्रांच्या आधारे तिच्या वैवाहिक आयुष्यात कथित छळ झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी कंचनच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलिसांनी जितेश कदम याच्याविरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मूळची दिल्ली येथील रहिवासी असलेली कंचन सुमारे पाच वर्षांपूर्वी मुंबईत आली होती. मॉडेलिंग क्षेत्रात काम करत असताना तिची जितेश कदम याच्याशी ओळख झाली. पुढे दोघांमध्ये जवळीक निर्माण झाली होती.

कंचनच्या मृत्यूनंतर तिच्या मोबाईलमधील व्हॉट्सअ‍ॅप संभाषण, विवाह प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रांची माहिती कुटुंबीयांच्या निदर्शनास आली. या माहितीच्या आधारे तिच्यावर वैवाहिक आयुष्यात मानसिक व अन्य प्रकारचा छळ झाल्याचा आरोप तिच्या आईने पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत केला आहे.

तक्रारीची दखल घेत पनवेल शहर पोलिसांनी जितेश कदम याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## महिला बेपत्ता

**पनवेल :** खारघर सेक्टर १९, मुर्बी गाव परिसरातून ३९ वर्षीय महिला बेपत्ता झाल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे.

सारिका आनंदराव सकटे (वय ३९) या खारघर मुर्बी गाव येथील साईकृपा बिल्डिंग येथे कुटुंबासह राहत होत्या.दूध आणण्यासाठी जात असल्याचे सांगून त्या घराबाहेर पडल्या. मात्र, त्यानंतर त्या घरी परतल्या नाहीत..

बेपत्ता महिलेची उंची सुमारे ५ फूट १ इंच असून बांधा बारीक, रंग गोरा, चेहरा उभा, केस काळे व मध्यम, नाक सरळ आणि डोळे काळे आहेत. घराबाहेर पडताना त्यांनी निळ्या रंगाची साडी परिधान केली होती. त्यांना मराठी व हिंदी भाषा बोलता व समजता येते.सदर महिलेबाबत कोणाला माहिती मिळाल्यास अथवा त्या आढळून खारघर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा,

## पनवेलमध्ये कोळी परिवाराच्या गणेशोत्सवात श्री नरसिंह अवतार देखावा भाविकांचे आकर्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा गेल्या ६५ वर्षांपासून अखंड जागर करणाऱ्या पनवेल येथील श्री. मदन कोळी परिवाराच्या गणेशोत्सवाला यंदाही भक्ती आणि कलात्मकतेची अनोखी जोड लाभली आहे. दरवर्षी आपल्या आकर्षक व वैविध्यपूर्ण देखाव्यांमधून गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेणाऱ्या कोळी परिवाराने यंदा 'श्री नरसिंह अवतार' हा देखावा साकारला असून, तो भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.

हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री. मदन कोळी परिवाराच्या गणेशमूर्तीची आकर्षक सजावट श्री साई आर्ट्स, कल्याण, रमेश जाधव आणि गणेश जाधव यांनी साकारली आहे. देखाव्याला भावपूर्ण आणि कलात्मक रूप देण्यासाठी पडदा पेंटिंग रमेश डुकरे, तर निवेदनाची जबाबदारी अ‍ॅड. प्रथमेश सोमण आणि अथर्व गोडबोले यांनी सांभाळली आहे. देखाव्याची भव्यता अधिक खुलविणारी आकर्षक रोषणाई नवीन पनवेल येथील जनार्दन केणी आणि सुरज भोईर यांनी साकारली आहे.भक्ती, कलात्मकता आणि सामाजिक प्रबोधन यांचा सुंदर संगम साधणारा हा 'श्री नरसिंह अवतार' देखावा गणेशभक्तांना आध्यात्मिक अनुभूती देत असून, भाविक मोठ्या संख्येने या देखाव्याला भेट देत आहेत.



# गणेश दर्शन
































पनवेल : महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी परिसरात विविध ठिकाणी विराजमान झालेल्या गणरायांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी सर्वांच्या सुख-समृद्धी, आरोग्य आणि मंगलमय जीवनासाठी बाप्पाच्या चरणी प्रार्थना केली.

# नागाव समुद्रकिनारी स्वच्छता उपक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

जागतिक ओझोन दिनानिमित्त आयआयटीएम पुणे आणि ग्रामपंचायत नागाव यांच्या संयुक्त विद्यमाने गणपती विसर्जनानंतर नागाव समुद्रकिनारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छ सागर, सुरक्षित सागर ५.० या उपक्रमांतर्गत आयोजित या अभियानात आयआयटीएम पुणे टीम, ग्रामपंचायत स्वच्छता व कचरा व्यवस्थापन पथक तसेच स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



गणपती विसर्जनानंतर समुद्रकिनारी जमा झालेला विविध प्रकारचा कचरा स्वयंसेवकांनी गोळा करून किनारा स्वच्छ केला. मोठ्या प्रमाणात कचरा संकलित करण्यात आल्याने समुद्रकिनाऱ्याच्या स्वच्छतेबरोबरच कचरा व्यवस्थापनाचे महत्त्वही अधोरेखित झाले.

यावेळी किनारपट्टीच्या स्वच्छतेसाठी सातत्याने योगदान देणाऱ्या अनुप महाजन व आयआयटीएम पुणे टीमचे सरपंच हर्षदा मयेकर यांनी आभार मानले तसेच प्रत्येक स्वच्छता उपक्रमात सक्रिय सहभाग घेणाऱ्या ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व कचरा व्यवस्थापन पथकाचे अभिनंदन करण्यात आले.

वारंवार स्वच्छता अभियान राबविण्याची गरजच भासू नये, अशी सामूहिक जबाबदारीची भावना प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे. नागावचे समुद्रकिनारे सदैव स्वच्छ राहावेत, हेच आपले सामूहिक स्वप्न असावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

या उपक्रमामुळे समुद्रकिनारा स्वच्छ ठेवण्याबरोबरच पर्यावरण संवर्धन आणि जबाबदार नागरिकत्वाची भावना जागृत व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.


# रोहा तालुक्यातील खरीप पीक लागवडीचे क्षेत्र घटले

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात खरीप हंगामातील लागवड झालेल्या भातासह अन्य पिकेही बहरत आहेत. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विविध पिकांची लागवड तालुक्यात झाली असले तरी लागवडीचे क्षेत्र घटल्याचे दिसून येत आहे.

गेल्या वर्षी खरीप हंगामात एकूण ७७५८ हेक्टर क्षेत्रावर लागवड झाली होती. यावर्षी क्षेत्र घटून ५३६५ क्षेत्रावर लागवड झाली आहे. या लागवडीमध्ये प्रामुख्याने भात, नाचणी, तूर, मुग, उडीद, तीळ, भाजीपाला यास अन्य इतर कडधान्य लागवड करण्यात आले आहे.

रोहा तालुक्यात सरासरी पाऊस २९२६ मिमी एवढा असतो. या वर्षी आतापर्यंत २८८७ मिमी पाऊस पडला आहे. यंदा पावसाला उशिरा



सुरुवात झाली. त्यानंतर जुलै महिन्यात १५० मिमी, ऑगस्ट महिन्यात ६० मिमी टक्के पाऊस पडला, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिली.

लागवडीचे क्षेत्र घटण्यामागे अनेक कारणे आहेत. यामध्ये यावर्षी पाऊस उशिरा झाल्याने काहींनी लागवड केली नाही. त्याचबरोबर वाढते औद्योगीकरण असल्यामुळे उद्योग क्षेत्रात कामगारांना चांगला पगार मिळत असल्याने खर्चिक भातशेतीकडे तरुणांचे दुर्लक्ष झाले आहे. काही क्षेत्र विविध प्रकल्पांसाठी शेत जमिनीचा वापर होत आहे. त्याचबरोबर वाढत्या गृहनिर्माण प्रकल्पामुळे जमिनीच्या वाढलेल्या किमती पाहता शेतकरी शेती सोडून या जमिनी विकसकांना, उद्योजकांना देत आहे. परिणामी लागवडीचे क्षेत्र घटत असल्याचे दिसून येते.

यावर्षी रोहा तालुक्यात भात ५०८१.८५ हेक्टर, नागली १८७.२५ हेक्टर, वरी १.१ हेक्टर, तुर ८०.९ हेक्टर, मुग ०.२५ हेक्टर, उडीद ०.२५ हेक्टर, इतर कडधान्य २.४ हेक्टर, तीळ १.४५ हेक्टर यासह भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. लागवडीचे क्षेत्र वाढवण्यासाठी विशेषतः कोकणातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

# नागोठण्यात पर्युषण पर्वानिमित्त चंद्रप्रभू स्वामींची पालखी



**नागोठणे : प्रतिनिधी**

जैन धर्मीयांच्या पवित्र पर्युषण महापर्वाच्या प्रारंभानिमित्त नागोठणे येथे जैन तीर्थंकर भगवान श्री चंद्रप्रभू स्वामी यांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. भक्तिभावपूर्ण आणि मंगलमय वातावरणात हा धार्मिक सोहळा झाला.

नागोठणे येथील जैन मंदिरातून पालखीचे विधिवत प्रस्थान झाले. संपूर्ण शहरातून पालखीची प्रदक्षिणा काढण्यात आली. यावेळी जैन समाजबांधवांनी मोठ्या भक्तिभावाने पालखी सोहळ्यात सहभागी होत दर्शन व आशीर्वाद घेतले. पालखी पुन्हा जैन मंदिरात आल्यानंतर धार्मिक वातावरणात सोहळ्याची सांगता झाली.

या मंगलमय प्रसंगी राष्ट्रवादीचे नेते किशोर जैन, नरेंद्रशेठ जैन, नागोठणे व्यापारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाशशेठ जैन, ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण जैन, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, मोहन नागोठणेकर, अकलाख पानसरे, जुगनशेठ जैन, सोहनशेठ जैन, संतोष कावेडिया, बंटीशेठ जैन आदींसह जैन बांधव उपस्थित होते.

# रोह्यातील हाल ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले आणि अलिबाग मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास व्यक्त करत हाल गावातील २६ ग्रामस्थांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य उर्वशी वाडकर, रोहा तालुका प्रमुख उदेश वाडकर, संपर्क प्रमुख संदेश मोरे, सहसंपर्क प्रमुख महेश कांबळे, घोसाळे विभाग प्रमुख समीर घोसाळकर, चणेरा विभाग प्रमुख गैनिनाथ कटोरे, घोसाळे विभाग संपर्क प्रमुख अंकेश म्हात्रे, तळघर शाखा प्रमुख अनिशय मोरे, हाल शाखा प्रमुख तुकाराम पानसरे आदी उपस्थित होते.

यावेळी जयवंत पवार, संदीप पानसरे, विशाल लटे, शिवाजी पानसरे, रोहिदास पानसरे, अविनाश लटे, महेंद्र डाके, अभिषेक लटे, विलास म्हात्रे, अल्पेश लटे, प्रेम पानसरे, जमादिश म्हात्रे, पांडुरंग पानसरे, प्रतीक पानसरे, निलेश म्हात्रे, राहुल लटे, उमाकांत तावरे, हेमंत पानसरे, संदेश लटे, निखिल म्हात्रे, रोकेश पानसरे, नरेंद्र पवार, निलेश पानसरे, रोहिदास म्हात्रे, सचिन लाटे आणि संतोष पानसरे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे हाल गावासह परिसरात शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढल्याचे दिसून येत आहे.



# पीएम विश्वकर्मा योजनेतून पारंपरिक कारागिरांना नवी दिशा -पालकमंत्री भरत गोगावले

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पारंपरिक कारागिरांच्या कौशल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांना स्वावलंबी आणि उद्योजक बनविण्यासाठी पीएम विश्वकर्मा योजना महत्त्वपूर्ण ठरत आहे. जिल्ह्यात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत असून पात्र असलेल्या प्रत्येक कारागिरापर्यंत योजनेचे लाभ पोहचविण्यासाठी प्रशासनाने अधिक गतिमानतेने काम करावे, असे निर्देश पालकमंत्री भरतशेठ गोगावले यांनी दिले.



भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, रायगड आयोजित पीएम विश्वकर्मा योजना लाभार्थी मेळावा अलिबाग येथील नियोजन भवनात झाला. त्यावेळी पालकमंत्री गोगावले बोलत होते.

व्यासपीठावर जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक सुधीर गायकवाड, उद्योग व सेवा उपायुक्त जी.एस. हरळ्या, जिल्हा प्रशासन अधिकारी पल्लवी भागवत, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सी.जे. डोलकर उपस्थित होते.

पालकमंत्री गोगावले म्हणाले की, राज्याचे उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांच्या पुढाकाराने आयोजित या मेळाव्यात पारंपरिक कारागिरांना कौशल्यविकास, आधुनिक साधने आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे. पीएम विश्वकर्मा योजना ही पारंपरिक कारागीर आणि हस्तकला क्षेत्रातील बांधवांना सन्मान, कौशल्यवृद्धी आणि आर्थिक बळ देणारी महत्त्वपूर्ण योजना आहे. सुतार, लोहार, कुंभार, विणकर, चर्मकार, नाभिक, धोबी, शिंपी, गवंडी यांसह विविध पारंपरिक व्यवसायातील कारागिरांच्या कौशल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांना स्वावलंबी करण्याचे काम या योजनेतून होत आहे.

जिल्ह्यातील ८०९ ग्रामपंचायतींपैकी ७८६ ग्रामपंचायती पीएम विश्वकर्मा योजनेच्या पोर्टलवर ऑनबोर्ड झाल्या आहेत. जिल्ह्यातील १५ हजार २७२ कारागिरांनी ऑनलाइन नोंदणी केली असून त्यापैकी तीन हजार ३८५ अर्जांना मंजुरी मिळाली आहे. आतापर्यंत एक हजार ७९८ लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले, तर ९२३ कारागिरांना १५ हजार रुपयांचे टूलकिट देण्यात आले आहे.

योजनेंतर्गत लाभार्थ्यांना मूलभूत प्रशिक्षणादरम्यान दररोज ५००रुपये विद्यावेतन, प्रशिक्षणानंतर टूलकिटसाठी १५ हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहन तसेच व्यवसायवाढीसाठी तारणमुक्त कर्जसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. पात्र लाभार्थ्यांना कर्जवाटपाची प्रक्रियाही सुरू आहे.

प्रशासन आणि बँक प्रतिनिधींनी प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करावी. उर्वरित २२ ग्रामपंचायतींचे ऑनबोर्डिंग पूर्ण करण्याबरोबरच प्रशिक्षण बाकी असलेल्या एक हजार ५८७ कारागिरांचे प्रशिक्षण तातडीने सुरू करावे, अशा सूचना पालकमंत्री गोगावले यांनी दिल्या. पात्र कारागिरांच्या कर्जप्रकरणांची विनाकारण विलंब न करता पूर्तता करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले की, बदलत्या काळानुसार पारंपरिक कारागिरांनी नवीन कौशल्ये आत्मसात करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, तर प्रास्ताविकात हरळ्या यांनी जिल्ह्यातील एकही पात्र कारागीर योजनेपासून वंचित राहू नये यासाठी जिल्हास्तरीय व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून प्रभावीपणे कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना धनादेश व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास पीएम विश्वकर्मा योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पाली : भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई यांनी आपल्या निवासस्थानी विराजमान गणरायाची पत्नी ज्योत्स्ना देसाई यांच्यासोबत आरती केली.** (छाया : धम्मशील सावंत)



**खालापूर : येथील पोलीस ठाण्यात गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून सहाय्यक निरीक्षक संदीप शिंगटे यांनी परिवारासह दर्शन घेतले.** (छाया : अर्जुन कदम)

# पनवेल-कर्जत नव्या रेल्वेमार्गासह निसर्गसौंदर्याचा देखावा

**चौक : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सव म्हटला की भक्ती, उत्साह आणि आकर्षक सजावटीची रेलचेल पाहायला मिळते. दरवर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासकामांवर आधारित देखावे साकारले जातात. यंदाच्या गणेशोत्सवात चौक येथील हातनोली गावातील देशमुख कुटुंबीयांनी साकारलेला देखावा गणेशभक्तांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे. नव्या पनवेल-कर्जत रेल्वेमार्गासह रायगड जिल्ह्याच्या निसर्गसौंदर्याचा मनोहारी मिलाफ या देखाव्यात करण्यात आला आहे.



देशमुख कुटुंबीयांकडून गेल्या अनेक वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा केला जात आहे. यंदाही गणरायाच्या स्वागतासाठी त्यांनी आकर्षक देखावा उभारला असून त्यातून परिसरातील विकास आणि निसर्गसंपदेचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यामुळे हा देखावा केवळ सजावटीपुरता मर्यादित न राहता परिसरातील महत्त्वाची ठिकाणे आणि आगामी विकासकामांची माहिती देणारा ठरत आहे.

या देखाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे पनवेल-कर्जत नवीन रेल्वेमार्गाची प्रतिकृती. पनवेल, चौक आणि कर्जत या रेल्वे स्थानकांच्या प्रतिकृती देखाव्यात साकारण्यात आल्या आहेत. रेल्वेमार्गामुळे या परिसरातील दळणवळणाला मिळणारी चालना आणि त्याचबरोबर बदलणाऱ्या परिसराचे चित्र देखाव्यातून मांडण्यात आले आहे.

रेल्वेमार्गासोबतच मोरबे धरण, एनडी स्टुडिओ, इर्शाळगड, सोंडाई किल्ला आणि माथेरान या परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणांच्या प्रतिकृतीही साकारण्यात आल्या आहेत. डोंगररांगा, हिरवाई आणि निसर्गरम्य परिसर यांची आकर्षक मांडणी करण्यात आल्याने देखाव्याला अधिक उठाव मिळाला आहे. त्यामुळे गणेशभक्तांना एकाच ठिकाणी रेल्वे विकासकामासोबतच परिसरातील निसर्गरम्य ठिकाणांचे दर्शन घडत आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने उभारण्यात आलेला हा देखावा पाहण्यासाठी नागरिक आणि गणेशभक्त उत्सुकता दाखवत आहेत.

# पराडे कॉर्नर येथे कारची दुचाकीला धडक; चौघे जखमी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पराडे कॉर्नर येथे अज्ञात कारचालकाने मोटरसायकलला धडक देऊन अपघात केल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीवरील कुटुंबातील चार जण जखमी झाले असून वाहनाचेही नुकसान झाले आहे.

अपघातानंतर संबंधित कारचालकाने घटनास्थळावरून पलायन केल्याचे पोलिसांत दाखल तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पराडे कॉर्नर येथे सफेद रंगाच्या कारवरील अज्ञात चालकाने वाहन अतिवेगाने, हयगयीने व बेदरकारपणे चालवून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. यावेळी कारने दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला.

या अपघातात फिर्यादीस किरकोळ दुखापत झाली असून त्यांची पत्नी अक्षता मुंढे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे तसेच त्यांची सहा वर्षांची मुलगी मायली आणि एक वर्षाचा मुलगा स्मरण यांना साधी दुखापत झाली आहे.

अपघातानंतर अज्ञात कारचालकाने जखमींना मदत न करता तसेच अपघाताची खबर न देता घटनास्थळावरून कारसह पलायन केले. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून फरार कारचालकाचा शोध सुरू आहे.



**माणगाव : येथील साईनगर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे यंदाचे रौप्यमहोत्सवी वर्ष असून साईनगरचा राजाच्या दर्शनाला भाविक आवर्जून येत आहे.** (छाया : सलीम शेख)



**रोहा : तालुक्यातील पिंगळसई येथे देशमुख तरुण मंडळातर्फे एक गाव एक कुटुंब एक गणपती उत्सव श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा केला जात आहे.** (छाया : महादेव सरसंबे)


पद्माकर मढवी, वेश्वी, उरण


सुभाष हरिश्चंद्र मोहीत, दादरपाडा, उरण


प्रमोद कडू, खारघर, से. ३४


ओंकार चंद्रकांत पाटील, खांदा कॉलनी


रवींद्र शंकर ठोंबरे, ठोंबरेवाडी, पनवेल


दिलीप ठाकूर, शिवाजीनगर, पनवेल


जाधव परिवार, खांदा कॉलनी से.१


रामदास पाटील, तुर्भे, नवी मुंबई



राजेंद्र रघुनाथ कदम आणि गणेश राजेंद्र कदम, धरणा कॅम्प, पनवेल


अल्टीस सोसायटी (मॅरेथॉन नेक्झॉन), पळस्पे फाटा, पनवेल


अनिल गजानन पाटील, दिघोडे, उरण


रामकृष्ण हरिभाऊ पाटील, दीव बेडे, वढाव, पेण


प्रवीण राठोड, खांदा कॉलनी, से. ११





महेश सदानंद म्हात्रे, कोंढरीपाडा, उरण







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com